आदेशार्थ सादर

ग्रंथालय विभाग,
दिनांक :- ०६/१२/२०२१.

**विषय:- मध्यवर्ती ग्रंथालयातील ग्रंथाचे किडी व वाळवी पासून संरक्षण करणेबाबत पुन:श्च दरपत्रके मागविणेबाबत..**

या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अंदाजे ३८५४५ ग्रंथ आहेत. या मौल्यवान ग्रंथाचे किडी (Bookworm) वाळवी (Termite) व बुरशी (Moulds) यांचेपासून संरक्षण करणे आवश्यक आहे. २०१८-२०१९ या वर्षाची चौथी व शेवटची औषध फवारणी दिनांक ४-०८-२०१८ रोजी करण्यात आली होती.

सन २०२१ -२०२२ करिता ग्रंथ संरक्षणार्थ औषध फवारणी (Pestiside Spray) करणे अत्यावश्यक आहे. याशिवाय ग्रंथालय इमारतीच्या भूपृष्ठाखालून वाळवीचा उपद्रव होवू नये म्हणून प्रत्येक ५ वर्षानंतर भूपृष्ठाखाली वाळवी प्रतिबंधक औषधोपचार केला जातो. त्यामुळे इमारतीच्या आतील ग्रंथ व नियतकालिके सुस्थितीत राहतील.

अतएव सन २०२१ -२२ करिता ग्रंथ व नियतकालिके राहण्यासाठी ग्रंथालयात किडी व वाळवी प्रतिबंधक औषधोपचार करणे आवश्यक आहे.

१) तेव्हां प्रतिवर्षाप्रमाणे मौल्यवान ग्रंथाचे किडी व वाळवी पासून संरक्षण करणेकरिता ग्रंथावर प्रतिबंधक औषधफवारणी करणेकरिता

२) ग्रंथालय इमारतीच्या भूपृष्ठाखालून होणाऱ्या वाळवीच्या प्रार्दुभावापासून संरक्षण करणेकरिता भूपृष्ठाखाली प्रतिबंधक औषधोपचार करणेकरिता

**जा.क्र/शावैममि/भांडार/दरपत्रके/१२०१७/२०२१दि.१८/११/२०२१ रोजीच्याआदेशान्वये ऑनलाईन दरपत्रके मागविण्यात आली होती दिलेल्या मुदतीत दि. ५/१२/२०२१ अखेर एकही दरपत्रके आली नाहीत. सबब दुसऱ्या वेळी मध्यवर्ती ग्रंथालयातील ग्रंथाचे किडी व वाळवी पासून संरक्षण करणेकरिता वरील दोन प्रकारच्या वाळवी, किडी व बुरशी प्रतिबंधक औषध फवारणी बाबत पुन:श्च दरपत्रके मागविणेस मंजूरी मिळावी ही विनंती.**

मंजूरी व आदेशार्थ सादर.

for [signature]
ग्रंथपाल
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

[signature]
अध्यक्ष
ग्रंथालय समिती

[signature]
प्रशासकीय अधिकारी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

[signature]
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.

# GOVERNMENT MEDICAL COLLAGE MIRAJ

Tel No:0233-2233090-99 FAX-2231959 Email:- deangmcmiraj@yahoo.co.in


जा.क्रं/शावैमवि/भांडार/दरपत्रके/१२६९८/२०२१ दिनांक :- ०८/१२/२०२१

**संस्थेच्या संकेत स्थळावर डाऊनलोड करुन ऑनलाईन पुनश्चा दरपत्रके मागणी**

**विषय :- मध्यवर्ती ग्रंथालयातील ३८५४५ ग्रंथाचे किडी व वाळवी पासून संरक्षण करणेसाठी औषध फवारणी एका वर्षात चार वेळा फवारणी (anti termite treatment) करणेबाबतची दरपत्रके मागविण्याबाबत.....**

(ग्रंथालय विभाग ,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज.)

खाली नमुद केलेलया शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज या संस्थेच्या www.gmcmmiraj.edu.in या संकेतस्थळावर ग्रंथालय विभागासाठी एका वर्षात चार वेळा औषध फवारणीसाठी दरपत्रके मागविण्यात येत असून अधिकृत पुरवठादारांनी पुरवठयाचे दरपत्रक दिलेल्या मुदतीच्या आत या संस्थेत पाठविण्यात यावे सदरचे दर बाजार भावाशी निगडीत व कमीत कमी असावेत.

| अ.क्रं | औषध फवारणी | मागणी | सर्व करासह नमुद करावे |
|---|---|---|---|
| १) | ३८५४५ ग्रंथाचे किडी, वाळवी बुरशी पासुनचे संरक्षण करणेसाठीचे औषध फवारणी करणे | एका वर्षात चार वेळा (तीन महिन्यातून एक वेळा) | |
| २) | ग्रंथालय इमारतीच्या भूपृष्ठाखालून होणाऱ्या वाळवीचा प्रार्दुभावापासून संरक्षण करणेकरिता भूपृष्ठाखाली प्रतिबंधक औषधोपचार करणे. | पाच वर्षातुन एक वेळा | |

सदरहु दरपत्रक या कार्यालयात दिनांक 25/12/२०२१ या कालावधीत प्राप्त होणे आवश्यक आहे. सदरहु दरपत्रकाच्या लिफाप्यावर वस्तुचे नांव व अंतिम दि.25/12/२०२१ असे नमुद करुन योग्यरित्या सिलबंद करुन खालील पत्त्यावर पाठवावे.

**"अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज. ४१६४१० पंढरपुर रोड मिरज. जि. सांगली"**

<u>दरपत्रक मागवितांना खालील अटी व शर्थी लागू राहतील</u>

१) सदरचे औषध फवारणीचे उत्तम दर्जाचे असावे.व त्याच्या एक्सपायरी दिनांक जास्त कालावधीचा असावा.
२) सदरचे औषध फवारणीचे दरपत्रकात वॉरंटी व गॅरंटीचा कालावधी आसावा.
३) सदरचे औषध फवारणीचे कोणत्या कंपनीचे आहे ते नमुद करणे बंधनकारक राहील.
४) सदरचे फवारणीचे औषधाचे दर कमीत कमी असावेत व उत्तम दर्जाचे असावे.
५) सदरचे फवारणीचे औषधाचे दर हे करासहीत नमुद करावे.
६) सदरचे औषध फवारणी करतांना औषधची ग्रंथावर कोणताही परीणाम होणार नाही याची काळजी घेण्यात यावी ग्रंथ खराब झालेस त्याची पुर्ण जबाबदारी आपणावर राहील.
७) ग्रंथावर औषध फवारणी करतांना औषध पाण्यांत मिश्रण करु नये हे आपणस बंधनकारक राहील.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज